# ॲम्बेसिडर चॅरिटी रिलेचे आयोजन

मडगाव, दि. २ (क्रीडा प्रतिनिधी): भारतातील चारचाकी क्षेत्रातील हिंदुस्थान मोटर्स व अनाथ मुलांच्या सहकार्यासाठी काम करणाऱ्या कामा इंडिरो या संस्थेच्या विद्यमाने ॲम्बेसिडर चॅरिटी चॅलेंज रिलेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेची सुरुवात दक्षिण गोव्यातील सेर्नाभाटी येथील बे वॉच या पंचतारांकित हॉटेलजवळून उद्या, दि. ३ रोजी सकाळी ८ वाजता होणार आहे. गोव्यातील विविध भागांतून ५० कि. मी.चे अंतर पार केल्यानंतर कारवारमार्गे दक्षिण पश्चिम विभागातील कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या राज्यांत तिचा दौरा असणार आहे. तसेच दक्षिण भारतातील २०० कि. मी.चा टप्पा ही रिले पार करणार आहे. या रिलेत एकूण २४ ॲम्बेसिडर गाड्यांचा सहभाग असणार आहे, असे हिंदुस्थान मोटर्सचे संपर्क व्यवस्थापक राजीव सक्सेना यांनी सांगितले.

एकेकाळी हिंदुस्थान मोटर्सच्या ॲम्बॅसिडर या गाड्या भारतीय रस्त्यावर अधिराज्य गाजवत होत्या व अजूनही ३० ते ३५ वर्षांपूर्वीच्या ॲम्बेसिडर गाड्या भारतीय रस्त्यावरून सुरळीत धावत असल्याचे दृष्टीला येत आहे. त्याच प्रतिकृतीच्या आधुनिक स्वरूपातील रिट्रो स्टायल मॉडर्न ॲम्बॅसिडरचे अनावरण येत्या काही दिवसांत हिंदुस्थान मोटर्स करणार असल्याचे सांगितले.



कार्मा इंडिरोचे समन्वयक ग्रॅहम स्मिथ. (छाया : दिनेश साखळकर)

कार्मा इंडिरो या संस्थेचा रिलेत सहभाग असणार आहे. या संस्थेतर्फे ॲडव्हेंचर आश्रम व रेम्बो ट्रस्ट चिल्ड्रन चॅरिटी या नावाने अनाथ व असाहाय्य मुलांच्या सहकार्यासाठी कार्यरत आहे. ही संस्था निधी जमविण्याच्या हेतूने या रिलेत सहभागी आहे, असे या संस्थेचे समन्वयक ग्रॅहम स्मिथ यांनी सांगितले.